# महाराष्ट्र विधानपरिषद

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम

## बुधवार, दिनांक १२ मार्च, २०२५

## (सकाळी १०.०० ते ११.४५)

(क) : **(मंगळवार, दिनांक ४ मार्च, २०२५, बुधवार, दिनांक ५ मार्च, २०२५, गुरुवार, दिनांक ६ मार्च, २०२५, शुक्रवार ७ मार्च, २०२५ व मंगळवार, दिनांक ११ मार्च, २०२५ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव ) — (चर्चा पुढे सुरु व मंत्र्यांचे उत्तर) —**

**सर्वश्री प्रविण दरेकर**, विक्रम काळे, हेमंत पाटील, सदाशिव खोत, अमोल मिटकरी, डॉ.मनिषा कायंदे, सर्वश्री परिणय फुके, शिवाजीराव गर्जे, सतिश चव्हाण, प्रसाद लाड, पंकज भुजबळ, श्रीकांत भारतीय, श्रीमती भावना गवळी, श्रीमती चित्रा वाघ, सर्वश्री कृपाल तुमाने, वसंत खंडेलवाल, किशोर दराडे, किरण सरनाईक, विक्रांत पाटील, योगेश टिळेकर, निरंजन डावखरे, श्रीमती उमा खापरे, सर्वश्री अमित गोरखे, ज्ञानेश्वर म्हात्रे, अमरीशभाई पटेल, राजहंस सिंह, धर्मगुरु बाबुसिंग राठोड, रणजितसिंह मोहिते-पाटील, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव —**

"शेतकरी सुखी, तर राज्य सुखी" हा मंत्र व शेतकऱ्यांच्या हिताचा विचार केंद्रस्थानी ठेवून राज्यातील बळीराजाला स्थैर्य देणे, त्याला बळकट करणे हे ध्येय समोर ठेवून आणि नारी शक्ती व युवा शक्तीला प्राधान्य देऊन राज्यात विविध योजना गतीमानतेने कार्यान्वित करण्याचा, जन कल्याणाचा वसा घेतलेल्या या शासनाचा प्रयत्न असणे, "नमो शेतकरी महासन्मान निधी" योजनेत राज्यातर्फे प्रती शेतकरी ६ हजार रुपये देण्यात येत असणे, केवळ १ रुपयात पिक विमा देण्यात येत असून त्यायोगे महाकृषी विकास अभियान राबविण्यात येत असणे, नुकसानीचे पंचनामे जलद व पारदर्शी होण्यासाठी ई-पंचनामा प्रणाली तसेच ई-फेरफार, संगणकीय सातबारा उतारे यासारख्या योजना राबवून पारंपारिक शेतीला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देण्यात आली असणे, शेतकऱ्यांचा आर्थिक आधार बळकट करण्यासाठी "मा. बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट)" प्रकल्प कार्यान्वित केला असणे, शेतमालाला बाजारपेठ मिळवून देण्यासाठी शेतकरी ते खरेदीदार अशी मूल्य साखळी विकसित करण्यात आली असणे, "मागेल त्याला शेततळे" या योजनेला शेतकऱ्यांचा उदंड प्रतिसाद लाभल्याने त्यात फळबागा, ठिंबक सिंचन,

अग्रिम प्रत

शेडनेट, हरितगृहे, आधुनिक पेरणी यंत्रे, कॉटन श्रेडर यांचा समावेश करण्यात आला असणे, शेतकऱ्यांसाठी महत्वाचे असणारे वैनगंगा पैनगंगा नदीजोड प्रकल्प, मराठवाडा वॉटर ग्रीड, POCRA टप्पा-२ तसेच, जलयुक्त शिवार टप्पा-२ यासारखे महत्वाकांक्षी प्रकल्प तातडीने मार्गी लावण्याचे प्रयोजन असणे, मविआकडून शेतकऱ्यांना नैसर्गिक आपत्तीसाठी नुकसान भरपाई म्हणून केवळ ८,७०१ कोटी निधी वितरित करण्यात आला असताना विद्यमान शासनाच्या काळात हाच निधी १६,३०९ कोटी वितरित केला असणे, राज्यातील शेतकरी बांधवांना दिवसा वीज मिळावी याकरिता राज्यातील सर्व सब स्टेशनच्या परिसरात सोलर पार्क उभारण्याचे प्रयोजन असणे, याद्वारे निर्माण झालेल्या विजेचा वापर कृषी फिडर्सना पुरवठा करण्यासाठी अपेक्षित असणे, राज्यात जगातील सर्वात मोठा ९ हजार मेगावॅट क्षमता असलेला डिस्ट्रब्युटेड रिन्युएबल एनर्जी प्रकल्प उभारण्यात येत असणे, मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० मुळे ५० टक्के कृषी फिडर्स सौरऊर्जेवर चालविणे शक्य होणार असणे, विद्यमान शासनाने शेतकऱ्यांना सिंचनासाठी "मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजना" जाहिर केली असणे, या शासनाने "मागेल त्याला सौरकृषी पंप योजना" सुरु केली असल्याने शेतकऱ्यांना केवळ १० टक्के रक्कम भरुन सौर पॅनल्स व पंपासहित सर्व सिंचन सुविधा प्राप्त होणे, दलित आणि आदिवासी शेतकऱ्यांना तर ही रक्कम केवळ ५ टक्के भरावी लागणे, राज्यात शेतकऱ्यांसाठी अतिशय महत्वाचे पाणंद रस्ते तातडीने पूर्ण करण्याकरिता "मातोश्री पाणंद रस्ते योजना" शेतकऱ्यांच्या हिताच्या दृष्टीने अधिक सुटसुटीत करुन राबविण्याची आवश्यकता, या शासनाच्या काळात २७ सिंचन प्रकल्पांना मान्यता देण्यात आली असणे, परिणामी विशेषतः मराठवाडा व विदर्भातील शेतकऱ्यांना वर्षांतून एकापेक्षा जास्त पिके घेणे शक्य झाले असणे, राज्यात जलयुक्त शिवार, गाळमुक्त धरण, गाळमुक्त शिवार, मागेल त्याला शेततळे इ. योजना एकत्रितपणे राबविल्याने केंद्रीय जलशक्ती मंत्रालयाने जाहिर केलेल्या भारतातील जलाशयांच्या गणनेत महाराष्ट्राचा पहिला क्रमांक आला असल्याचे निदर्शनास येणे, हे अभियान देशातील अन्य राज्यांसाठी एक आदर्श व पथदर्शी झाले असणे, कर्जबाजारी शेतकऱ्यांना आधार देऊन कर्जमुक्त करण्यासाठी "महात्मा ज्योतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना" सुरु करण्यात आली असणे, कांद्याला योग्य भाव मिळावा याकरिता कांद्याचे दर ठरविण्याचे अधिकार केंद्राच्या ग्राहक संरक्षण मंत्रालयाने स्वतःकडे ठेवले असणे, तूर हे जिरायती शेतकऱ्यांचे पिक असून ते नैसर्गिक आपत्तीत तग धरणारे, कमी खर्चाचे व आंतरपिक पध्दतीने घेता येणारे असल्याने त्याची उत्पादकता वाढविण्यासाठी प्रोत्साहन देण्याची आवश्यकता, कापूस लागवड ते वेचनी यातील बहुतांश कामे मजुरांऐवजी यांत्रिकीकरणाच्या

माध्यमातून करणे आवश्यक असून हमी भावाने कापूस खरेदीसाठी सीसीआयने उघडलेल्या केंद्राची संख्या वाढविण्याची आवश्यकता, किंमत स्थिरीकरण योजनेंतर्गत नाफेडने २.२२ लाख मे.टन व एनसीसीएफ अंतर्गत ०.३५ लाख मे. टन कांदा खरेदी केला असणे, हमीभावाने कापूस खरेदीसाठी सी.सी.आयने राज्यात १२१ खरेदी केंद्रे मंजूर केली असणे, कापूस प्रक्रिया उद्योगातील सर्व घटकांना काही सवलती देण्याची आवश्यकता, कापूस, सुत, कापड निर्यातीच्या संधी उपलब्ध करण्याची आवश्यकता, १२ व्या पंचवार्षिक योजनेत अन्नधान्याच्या गरजेसोबतच नगदी पिकांचीही गरज भागविण्यासाठी कापूस पिकाचा समावेश करण्यात आला असणे, कापूस आधारित पिक पध्दतीस चालना देणे, कापूस पिकात एकात्मिक किड व्यवस्थापनास चालना देणे, अधिक लांब धाग्याच्या कापसांच्या वाणांची प्रात्यक्षिके आयोजित करून कापूस उत्पादकास चालना देण्याचे या शासनाचे धोरण असणे, कापसासाठी ५०० व सोयाबीन साठी २७० शेतकरी उत्पादक कंपन्या स्थापन करण्याचा निर्णय शासनाने घेतला असणे, धानाला २० हजार रुपये बोनस देण्याचा निर्णय या शासनाने घेतल्याने त्याचा ६ लाख शेतक-यांना लाभ मिळणे, 'नारीशक्ती दुत ॲप' हे क्रांतिकारी ॲप्लीकेशन शासनाने सुरु केल्याने ते गरजु महिलांना ओळखण्यासाठी व सक्षम करण्यासाठी उपयुक्त ठरत असणे, राज्यातील युवकांना स्पर्धेच्या युगात शक्तीशाली स्पर्धक म्हणून उभे राहता यावे याकरिता युवा प्रशिक्षण केंद्राची स्थापना करण्यात आली असणे, युवकांना विविध उपक्रमांमध्ये सहभागी होण्याच्या दृष्टीने त्यांना वसतीगृहाची, निवासाची कुठेही अडचण येऊ नये या उद्देशाने राज्यातील ६ महसूल विभागात १०० युवक-युवतींसाठी युवा वसतीगृह उभारण्यास मान्यता देण्यात आली असणे, राज्यात पर्यटनाला चालना देण्यासाठी शाश्वत पर्यटन धोरण आखण्यात येत असणे, राज्यातील ५० नवीन पर्यटन स्थळांची निवड करून त्या ठिकाणी थीम पार्क, ॲडव्हेंचर स्पोर्ट, शॉपिग मॉल, वॉटर मॉल आणि निवास व्यवस्था करण्यात येत असणे, बुलढाणा येथील लोणार, अंजिठा-वेरुळ, कळसूबाई, त्र्यंबकेश्वर तसेच कोकणातील सागरी किल्ल्याच्या ठिकाणी पर्यटकांसाठी उच्च दर्जाच्या सुविधा निर्माण करण्यात येत असणे, सातारा येथील शिवसागर जलाशय, भंडाऱ्यातील गोसीखुर्द जलाशय तसेच जळगाव येथील वाघुर जलाशय येथे नाविन्यपूर्ण जलपर्यटन प्रकल्प राबविण्यात येत असणे, कोकणातील पर्यटनास चालना देण्यासाठी शिवकालीन ३२ गडकिल्ल्यांचे नुतनीकरण व संवर्धन करण्याचे प्रस्तावित असणे, राज्यातील पर्यटकांना व भाविकांना योग्य दरामध्ये उत्तम व सुरक्षित सुविधा पुरविण्यासाठी श्रीनगर, जम्मु काश्मीर आणि अयोध्या येथे महाराष्ट्र भवन बांधण्याचा निर्णय घेतला असणे, राज्यात शेतकरी कर्जमुक्त व सधन होऊन शेतकरी,

अप्रकाशित प्रत

शेतमजुर, महिला व युवकांना बळकट करण्यासाठी, पर्यटनाला चालना मिळण्यासाठी व लोक कल्याणकारी आणि गतीमान राज्य निर्माण करण्यासाठी करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(ख) : **(गुरुवार, दिनांक ६ मार्च, २०२५, शुक्रवार, दिनांक ७ मार्च, २०२५ व मंगळवार, दिनांक ११ मार्च, २०२५ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव** ) — **(चर्चा पुढे सुरु व मंत्र्यांचे उत्तर)** —

**सर्वश्री अंबादास दानवे,** सतेज ऊर्फ बंटी पाटील, एकनाथराव खडसे, ॲड.अनिल परब, सर्वश्री अभिजीत वंजारी, शशिकांत शिंदे, सचिन अहिर, अशोक ऊर्फ भाई जगताप, सुनिल शिंदे, जयंत आसगावकर, जगन्नाथ अभ्यंकर, डॉ.प्रज्ञा सातव, सर्वश्री धीरज लिंगाडे, राजेश राठोड, सुधाकर अडबाले, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव** —

"सरकारच्या फसव्या योजना आणि दिशाहीन धोरणे यामुळे राज्यातील शेतकरी, मजूर, महिला आणि युवक संकटात असणे, ग्रामीण आणि आदिवासी भागांत अद्यापही मूलभूत आरोग्य सुविधा उपलब्ध नसणे, अनेक ठिकाणी जिल्हा रुग्णालये आणि प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये वैद्यकीय अधिकारी, औषधे आणि उपकरणांचा अभाव असणे, ठाणे आणि पुण्यातील मनोरुग्णालयांतील परिस्थिती अत्यंत दयनीय असणे, सरकारी रुग्णालयांत अस्वच्छता, वैद्यकीय अधिकारी व परिचारिकांची हजारो पदे रिक्त असून पदभरती अभावी रुग्णसेवा प्रभावित होणे, सरकारी वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये प्रवेश मिळवणे कठीण झाले असून खासगी वैद्यकीय शिक्षण अतिशय महाग झालेले असूनही शासनाने सरकारी वैद्यकीय महाविद्यालयांची संख्या वाढविण्याऐवजी नविन खाजगी वैद्यकीय महाविद्यालय सुरु करण्यास दिलेली परवानगी, शासकीय रुग्णालयांना औषध पुरवठा करण्याचे कंत्राट आपल्या जवळील कंत्राटदारास मिळण्याच्या दृष्टीने हाफकिन महामंडळासोबत केलेला करार रद्द केलेला असणे, तथापि, सदरहू कंत्राटदाराकडून औषध पुरवठा करण्यास होत असलेला विलंब, त्यामुळे अनेक रुग्ण उपचारा अभावी मृत्युला सामोरे जावे लागणे, सरकारने अनेक कर्जमाफी योजना घोषित केल्या पण सर्वांना प्रत्यक्ष लाभ मिळाला नसणे, विमा कंपन्या शेतकऱ्यांना भरपाई देत नसून शासन देखील त्यांच्यावर कठोर कारवाई करण्याकडे दुर्लक्ष करीत असणे, शेतीसाठी अपुरा वीजपुरवठा आणि सिंचन योजनांमध्ये भ्रष्टाचार झाल्याने शेतीला पाणी मिळत नसणे, शेतमालाला योग्य हमीभाव मिळत नसणे, बोगस खते व बियाणे विक्री करणाऱ्या संबंधित कंपनीवर कारवाई करण्यास होत असलेल्या विलंबामुळे शेतकऱ्यांचे

अप्रकाशित प्रत

मोठ्याप्रमाणात होणारे नुकसान, दलाल शेतकऱ्यांची लूट करीत असणे, कृषी संकटामुळे शेतमजूर आणि शेतकरी दोघेही बेरोजगार झालेले असणे, कृषी विभागात निविष्ठा खरेदी व विविध कामांमध्ये भ्रष्टाचार झाला असून त्यावर कारवाई करण्यास राज्य शासनाकडून होत असलेली दिरंगाई, विद्यमान व माजी मंत्र्यांच्या अखत्यारित असलेल्या खात्यातील विविध कामे रद्द करण्याचा घेतलेला निर्णय, परिणामी यामध्ये भ्रष्टाचार झाल्याचे समोरे येणे, चुकीचे निर्णय व नविन धोरणे यामुळे राज्यावर कर्जाचा वाढलेला बोजा, प्री-पेड मीटर लावण्यास नागरिकांचा विरोध असताही महावितरण कडून मीटर लावण्याची होत असलेली सक्ती, नव्या मीटरसाठी अतिरिक्त शुल्क आकारणे, महावितरणच्या ३२९ उप केंद्रांचे खासगीकरण करण्याचा सुरु असलेला प्रयत्न, शासनाच्या महत्त्वाच्या विभागांमध्ये हजारो जागा रिक्त असून, भरती प्रक्रिया लांबणीवर पडल्यामुळे अनेक उमेदवार शासकीय नोकरीपासून वंचित राहणे, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या ढिसाळ कारभारामुळे अनेक परिक्षांचा निकाल न लागणे, शासनाने काही खाजगी संस्थांचा फायदा होण्याच्या दृष्टीने कंत्राटी पध्दतीने कर्मचारी भरण्याचा घेतलेला निर्णय, बेरोजगार तरुणांसाठी ठोस धोरणे नसणे, राज्यातील इतर मागास वर्ग, भटक्या जाती व विमुक्त जाती, अनुसूचित जाती, जमाती व खुल्या प्रवर्गाच्या सारथी, बार्टी, महाज्योती सारख्या योजनांच्या अनुदान वितरणास होत असलेला विलंबामुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर होत असलेला परिणाम, शक्तीपीठ महामार्गास जनतेचा विरोध असूनही शासनाचा सदरहू प्रकल्प राबविण्यासाठी सुरु असलेला प्रयत्न, मुंबई-गोवा महामार्गाचे गत १२-१५ वर्षांपासून महामार्गाचे काम पूर्ण झालेले नसल्याने वाहतूक कोंडी आणि अपघाताच्या प्रमाणात वाढ झालेली असणे, महामार्गाच्या कामासाठी आवश्यक निधी वेळेवर मंजूर होत नसणे, अनेकवेळा कंत्राटदार बदलण्यात येवूनही दर्जाहीन काम सुरु असणे, पावसाळ्यात महामार्गावर पूरस्थिती निर्माण होत असूनही त्याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडेन १६ हजार कोटी रुपयांच्या विविध योजना राबविण्यात येणे, उक्त योजनेतून मिळणारी मदत थेट लाभार्थ्यांना मिळत नसून अन्य व्यक्तींना मिळणे, त्यामुळे अनेक कामगार योजनेतून मिळणाऱ्या लाभापासून वंचित राहिले असल्याच्या अनेक तक्रारी प्राप्त झाल्या असून सदरहू योजनेमध्ये भ्रष्टाचार झाल्याचे निदर्शनास येणे, या सर्व प्रश्नांकडे शासनाचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका".

अग्रिम प्रत

# (दुपारी १२.०० वाजता)

**एक : प्रश्नोत्तरे**

**दोन : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे —**

(१) **जलसंपदा मंत्री (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ)** : "गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, छत्रपती संभाजीनगर यांचा सन २०२०-२०२१ या वर्षाचा स्वतंत्र लेखा परीक्षण अहवाल व सन २०२१-२०२२ या वर्षाचा वार्षिक लेखा अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

(२) **उच्च तंत्रशिक्षण मंत्री** :

**(क)** "सावित्रीबाई फुले विद्यापीठ, पुणे यांचे सन २०२३-२०२४ या वर्षाचे वार्षिक लेखे" सभागृहासमोर ठेवतील.

**(ख)** "पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांचे सन २०२३-२०२४ या वर्षाचे वार्षिक लेखे" सभागृहासमोर ठेवतील.

**(ग)** "कवियित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव यांचे सन २०२३-२०२४ या वर्षाचे वार्षिक लेखे" सभागृहासमोर ठेवतील.

**(घ)** "संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती यांचे सन २०२३-२०२४ या वर्षाचे वार्षिक लेखे अहवाल" सभागृहासमोर ठेवतो.

**(ङ)** "स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांचे सन २०२३-२०२४ या वर्षाचे वार्षिक लेखे" सभागृहासमोर ठेवतील.

**(च)** "राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ, नागपूर यांचे २०२३-२०२४ या वर्षाचे वार्षिक लेखे" सभागृहासमोर ठेवतील.

अप्रधारित प्रत

**(छ)** "मुंबई विद्यापीठ, मुंबई यांचे सन २०२१-२०२२ या वर्षाचे वार्षिक लेखे" सभागृहासमोर ठेवतील.

**(ज)** "नाथाबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई यांचे सन २०१९-२०२० व सन २०२०-२०२१ या वर्षाचे वार्षिक लेखे, सभागृहासमोर ठेवतील.

**(झ)** "यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक यांचे सन २०२३-२०२४ या वर्षाचे वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(ञ)** "महाराष्ट्र राष्ट्रीय विधि विद्यापीठ, मुंबई यांचे सन २०२१-२०२२ ते सन २०२३-२०२४ या वर्षाचे वार्षिक लेखे अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(ट)** "महाराष्ट्र राष्ट्रीय विधि विद्यापीठ, नागपूर यांचे सन २०१६-२०१७ ते सन २०२२-२०२३ या वर्षाचे वार्षिक लेखे अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(ठ)** "महाराष्ट्र राष्ट्रीय विधि विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांचे सन २०२३-२०२४ या वर्षाचे वार्षिक लेखे अहवाल" सभागृहासमोर ठेवतो.

**(ड)** "महाराष्ट्र राष्ट्रीय विधि विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांचे सन २०२२-२०२३ या वर्षाचा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतो.

**(३) उद्योग मंत्री** : **(क)** "पश्चिम महाराष्ट्र विकास महामंडळ मर्यादित, पुणे यांचा सन २०२२-२०२३ या वर्षाचा बावन्नावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

असुधारित प्रत

**(ख)** "कोंकण विकास महामंडळ मर्यादित, मुंबई यांचा सन २०२३-२०२४ या वर्षाचा त्रेपन्नावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**तीन : (क) म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचना – (असल्यास)**

**(ख) म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचनांची निवेदने –**

(१) **श्री.मिलिंद नार्वेकर, वि.प.स.** यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील **सूचना क्रमांक १** वर **उप मुख्यमंत्री** निवेदन करतील :-

"जोगेश्वरी, पूर्व येथील हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे ट्रामाकेअर सेंटरमधील अतिदक्षता विभाग वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी उपस्थित न राहिल्याने बंद करण्यात आल्याबाबत."

(२) **श्री.अंबादास दानवे, वि.प.स.** यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील **सूचना क्रमांक २** वर **उप मुख्यमंत्री** निवेदन करतील :-

"छत्रपती संभाजीनगरमध्ये उन्हाळ्याची सुरुवात होताच शहरातील अनेक वसाहतींमध्ये बोअरवेल आणि विहिरींमधील पाण्याची पातळी घटू लागल्याने नागरिकांना पाणीटंचाईचा मोठा सामना करावा लागत असल्याबाबत."

**चार : लक्षवेधी सूचना – (म.वि.प. नियम १०१ अन्वये) –**

(१) **श्री.सुनिल शिंदे, वि.प.स** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **महसूल मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्य सरकारने सरकारी तिजोरीत महत्त्वाचा वाटा असलेल्या मुद्रांक शुल्कात दिनांक १ एप्रिल, २०२५ रोजीपासून १० टक्क्यांच्या वाढीचा निर्णय घेतलेला असणे, राज्य सरकारला घर, जमीन, दुकाने, मालमत्तांच्या खरेदी-विक्री आदींच्या दस्तांच्या नोंदणीवेळी जमा होणाऱ्या मुद्रांक शुल्कातून मोठ्या प्रमाणात महसूल मिळणे, रेडीरेकनेर हा सरकारसाठी महसूल प्राप्तीचा महत्त्वाचा दुवा ठरला असणे, राज्य सरकारने सन २०२१ पासून रेडीरेकनेरच्या

असुधारित प्रत

दरात वाढ केलेली नसल्याने आता माहे एप्रिलपासून त्यात वाढ होणार असणे, रेडीरेकनेरचे दर वाढल्यास सर्वसामान्य घर, मालमत्ता खरेदीदारांना वाढीव रक्कमेचा भुर्दंड सहन करावा लागणे, सन २०२४-२५ आर्थिक वर्षात मुद्रांक आणि नोंदणी शुल्क विभागाने डिसेंबर, २०२४ अखेरपर्यंत सुमारे ४० हजार कोटींचा महसूल प्राप्त केला असून संपूर्ण वर्षाचे उद्दिष्ट ५५ हजार कोटी रुपयांचे उद्दिष्ट असणे, नवीन आर्थिक वर्षात दिनांक १ एप्रिलपासून रेडीरेकनेर दरात वाढ झाल्यास त्या उत्पन्नात मोठ्या प्रमाणात वाढ होणे अपेक्षित असणे, एकदा राज्य सरकारने हे दर जाहीर केले की त्या दरांपेक्षा कमी किंमतीत मालमत्ता नोंदणी करता न येणे, त्यामुळे मालमत्ता खरेदीवर जीएसटी, मेट्रोचा अधिभार असताना नवीन दरवाढ सर्वसामान्यांच्या आर्थिक गणितांवर विपरित परिणाम करणारी ठरणारी असल्याने रेडीरेकनेर दरात वाढ करण्याबाबत घेतलेल्या निर्णयाचा फेरविचार करून सदरहू दरवाढ कमी करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(२) **सर्वश्री अभिजित वंजारी,** अशोक ऊर्फ भाई जगताप, राजेश राठोड, धीरज लिंगाडे, सुधाकर अडबाले, **वि.प.स** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण** मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-

"गडचिरोली जिल्ह्यामध्ये गेल्या अनेक वर्षापासून काही राईस मिलेर्सच्या माध्यमातुन मोठ्या प्रमाणात धानापासून तयार केलेल्या तांदळाच्या व्यवहारात अनियमितता व काळाबाजारच्या अनेक घटना घडणे, गडचिरोली जिल्ह्यातील मायाश्री राईस इंडस्ट्रीज, मायाश्री फुड इंडस्ट्रीज, मायाश्री ॲग्रो इंडस्ट्रीज, तसेच महालक्ष्मी ॲग्रो इंडस्ट्रीज, जय अंबे राईस इंडस्ट्रीज, सार्थक राईस इंडस्ट्रीज, विशाल राईस मिल अशा अनेक राईस मिलच्या विरोधात शेकडो तक्रारी पुराव्यासह शासनाला मिळाल्या असणे, शासकीय धान खरेदी केंद्रावरून खरेदी करण्यात आलेला धान स्थानिक राईस मिलेर्सला भरडाई करिता देण्यात येतो व तयार केलेल्या तांदूळ शासकीय डेपोमध्ये जमा करणे अनिवार्य असतांना अनेकदा शासकीय गोदामातून उचल केलेल्या धानाचा परस्पर विक्री करणे व त्यातून नफा कमविणे, इतर राज्यातून आणलेल्या निकृष्ट दर्जाचा तांदूळ हा शासकीय गोदामामध्ये भरडाई करून आणला आहे असे भासविणे व जमा करणे व तो निकृष्ट दर्जेचा तांदूळ खाण्या योग्य नसतांना शासकीय गोदामामधून सार्वजनिक वितरण प्रणालीच्या माध्यमातून राशन

अप्रकाशित प्रत

दुकानात व बाजारात जाणे, अशा पध्दतीचे अवैध काम सातत्याने सुरू असणे,अन्न व नागरी पुरवठा विभागाचे याकडे होत असलेले दुर्लक्ष, परिणामी यामध्ये कोट्यवधी रुपयांचा भ्रष्टाचार होत असल्याने सर्वसामान्य जनतेमध्ये पसरलेली तीव्र असंतोष व नाराजीची भावना, याबाबत शासनाने तातडीने चौकशी करुन कठोर स्वरुपाची कारवाई करण्याची आवश्यकता, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(३) **श्रीमती चित्रा वाघ,** सर्वश्री प्रसाद लाड, प्रविण दरेकर, **वि.प.स** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **महिला व बालविकास मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"मा.सर्वोच्च न्यायालयाच्या न्याय निर्णयानुसार राज्यात महिलांवर होत असलेल्या लैंगिक छळाच्या घटनांबाबत शासनाने विशाखा समिती स्थापन करण्याबाबत निदेश देणे, उक्त निदेशानुसार राज्यात शासकीय व खाजगी आस्थापनांमध्ये कामाच्या ठिकाणी विशाखा समिती स्थापन करुन त्यात आस्थापना प्रमुखाने यासाठी योग्य असलेल्या व्यक्तींमधून विशाखा समिती स्थापन करण्याची मार्गदर्शक तत्वे नमूद करणे, मा.सर्वोच्च न्यायालयाच्या न्याय निर्णयानुसार राज्यात कामाच्या ठिकाणी महिलांवर होत असलेल्या लैंगिक छळाबाबत विशाखा समिती स्थापन करण्याचे बंधनकारक असणे, असे असूनही काही ठिकाणी या समित्या स्थापन करण्यात न येणे, तर काही ठिकाणी या समित्यांना उक्त आस्थापनांमधून योग्य ते कार्यालय उपलब्ध करुन देण्यात न येणे, त्यामुळे महिलांना त्यांच्यावरील छळाची तक्रार करण्यासाठी योग्य ते कार्यालय उपलब्ध नसल्यामुळे तक्रारीविनाच पिढित महिला रहात असून सदरहू बाबतीत महिलांनी तक्रारी न केल्यामुळे त्यांच्यावर झालेला अन्याय निमूटपणे सहन करीत असणे,काही ठिकाणी अशा प्रकरणात कारवाई झाल्यास महिलांवर अंकुश ठेऊन त्यांची कामाच्या ठिकाणाहून अन्य ठिकाणी बदली करण्यात येणे अथवा त्यांना कामावरुन काढून टाकण्याची घटना घडणे, यावर शासनाचे कोणतेही नियंत्रण नसल्याने महिलांवर अन्याय होणे, महिला न्याय मागत असताना त्यांना न्याय मिळत नसल्याने त्यांच्यामध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण होणे, तसेच महिलांवर कामाच्या ठिकाणी लैंगिक छळाची अनेक प्रकरणे निर्णयाविनाच राहिली असणे तसेच निर्णय झालेला असताना देखील तो योग्य न होणे, या प्रकरणी शासनाने विशाखा

समितीच्या स्थापनेबाबत निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनांची कठोर व काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याची आवश्यकता, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(४) **श्री.शशिकांत शिंदे, वि.प.स** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून)** मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-

"राज्य शासनाने सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत रस्त्यांच्या कामांची निविदा प्रक्रिया राबविण्यात येणे, सदर निविदा प्रक्रियेमध्ये प्रमख जिल्हामार्ग, राज्यमार्गच्या विशिष्ठ लांबीमधील निरनिराळया साखळी क्रमांकावर वेगवेगळी कामे मंजूर झाली असल्यास एकत्रित निविदा काढण्यात यावी अन्यथा एकत्रित निविदा मागवू नयेत असे दिनांक १७ डिसेंबर, २०१६ रोजीच्या शासन निर्णयात स्पष्ट नमुद केलेले असतांनाही सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांकडून सदर शासन निर्णयांचे होत असलेले उल्लंघन, सार्वजनिक बांधकाम विभाग सातारा यांनी सन २०२३-२४ मध्ये ई-निविदा क्र.५९ व निविदा क्र.३२ काढणे, सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत मंजूर असणारी कामांची अंदाजपत्रके तयार करतांना रस्त्याची लांबी,सर्व मान्यता,निविदा प्रक्रियाही तशी होणे बंधनकारक असतांनाही कॉक्रीटीकरण करणे,खराब लांबी असतांनाही रस्त्याचे काम केले जाणे,जिहे-कठापूर, कोरेगांव, तडवळे, खेड, सातारारोड, पळशी राज्यमार्ग ११७ रोड प्रजिमा ३४ साखळी क्रमांक १/०० ते १/८०० ता कोरेगांव रस्ता सुधारणा,रुंदीकरणाचे काम चुकीचे असणे, साखळी क्र.१/१२५ व १/४०० असे दोन सीडी वर्क हे काम प्रत्यक्षात साखळी क्रमांक चुकीचे एकच काम झाले असणे, सातारा जिल्ह्यातील सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत झालेल्या कामाची सखोल चौकशी होण्याची आवश्यकता, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, शासन निर्णयाचे उल्लंघन करुन काम केल्याप्रकरणी दोषी असणाऱ्या अधिकाऱ्यांवर कडक कारवाई करून सदर निविदा प्रक्रिया तात्काळ रद्द करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(५) **श्री.श्रीकांत भारतीय, वि.प.स** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **ग्रामविकास मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यातील ग्रामपंचायतीना ब्रॉडबँड सेवेसाठी ३४ हजार कोटी खर्च होऊन एक ही ग्रामपंचायतला इंटरनेट सेवा उपलब्ध नसणे सरपंच, उपसरपंच

अग्रिम प्रत

यांचे मानधन शासनाने वाढ केलेली असताना गेल्या ८ महिन्यांपासून मानधन दिलेले नसणे, राज्यात ग्रामविकास भवन व सरपंच भवन बांधण्याबाबत वारंवार आश्वासन देऊनही त्याची पूर्तता करण्याबाबत अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात आलेली नसणे, जात प्रमाणपत्र वेळेवर दाखल केले नाहीत म्हणून सरपंच पद रद्द करण्यात येत असताना काही सरपंचानी जात प्रमाणपत्र देऊनही केवळ तहसील कार्यालयाने दाखल प्रमाणपत्र जिल्हाधिकाऱ्यांना पाठविले नसल्याने त्यांचे पदही रद्द करण्यात येणे, गावात जल जीवन मिशन अंतर्गत पाईप लाईनची कामे करताना केलेल्या खोदकामामुळे खराब झालेले दुरूस्त करण्यासाठी निधी उपलब्ध करून देण्याची आवश्यकता, प्रत्येक गावात स्वतंत्र तलाठी, ग्रामसेवक व वायरमन यांची नियुक्ती करण्याची आवश्यकता, वित्त आयोगाचा निधी बंधित अबंधित न करता ग्रामसभेला त्याचे अधिकार देण्याची आवश्यकता, जनसुविधा योजनेचे पैसे सर्व ग्रामपंचायतींना लोकसंख्येच्या प्रमाणात देण्याची आवश्यकता, जलजीवन योजनेकरीता सौर ऊर्जा उपलब्ध करून देण्याची आवश्यकता, गावठाणातील घरे ही गावच्या हद्दीबाहेर असल्याने तसेच त्याची नोंद ग्रामपंचायातीमध्ये नसल्याने अशा घरांना शासकीय योजनांचा लाभ देण्यास अडचणी येत असल्याने त्याबाबतचा निर्णय घेण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(६) **श्री.अमोल मिटकरी वि.प.स** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **सहकार मंत्र्यांचे** लक्ष वेधतील

"अकोला व वाशिम जिल्ह्यातील २३६७ शेतकऱ्यांचे ११२ सहकार सोसायटी व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने शेतकऱ्यांचे संमतीपत्र न घेता परस्पर पुनर्गठन करण्यात आल्याचे आढळून येणे, त्यामुळे नवीन कर्ज मिळण्याप्रकरणी महात्मा ज्योतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेच्या लाभापासून वंचित राहिले  असल्याचे माहे फेब्रुवारी, २०२५ मध्ये निदर्शनास येणे, त्यानुसार संबंधित सर्व शेतकरी १३.६४ कोटी कर्जे थकीत शेतकरी लाभापासून वंचित राहिल्यामुळे थकीत कर्जास माफी मिळणेसाठी मागणी केली असल्याचे निदर्शनास येणे, सदर बाब जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अकोला यांनी केलेल्या चौकशीअंती उघडकीस आल्याचे निदर्शनास येणे, त्यामुळे संबंधित ११२ सहकारी सोसायट्या तात्काळ बरखास्त करुन या सोसायट्यांच्या पदाधिकाऱ्यांविरुध्द तसेच अकोला जिल्हा मध्यवर्ती बँक

व्यवस्थापनाविरूद्ध पोलिसात गुन्हे दाखल करण्याची शेतकरी वर्गाकडून तसेच काही राजकीय पक्ष कार्यकर्त्यांकडून करण्यात आलेली मागणी, परिणामी, पर्यायाने शासनाची व जनतेची करण्यात आलेली फसवणूक, यामुळे सदर रक्कमेची कर्जे माफ करण्यात यावीत, अशीही मागणी करण्यात येणे, त्यामुळे संबंधित सहकारी सोसायट्या बरखास्त करुन त्यावर प्रशासकीय मंडळे स्थापन केल्यास, तरुण वर्गाला नोकरीची संधी मिळण्याची शक्यता लक्षात घेता, शासनाने याबाबत तातडीने चौकशी करुन कार्यवाही करण्याची आवश्यकता व उपाययोजना."

**पाच : म.वि.प. नियम १०१ – अ अन्वये विशेष उल्लेख – (असल्यास)**

# -मध्यंतर-

**सहा : सन २०२५-२०२६ च्या अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा (दुसरा व शेवटचा दिवस)**

**सात : (मंगळवार, दिनांक ११ मार्च, २०२५ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव ) –**

**सर्वश्री प्रविण दरेकर**, हेमंत पाटील, विक्रम काळे, प्रसाद लाड, डॉ.मनिषा कायंदे, श्री.सतिश चव्हाण, श्रीमती चित्रा वाघ, श्रीमती भावना गवळी, सर्वश्री कृपाल तुमाने, श्रीकांत भारतीय, अमोल मिटकरी, किशोर दराडे, निरंजन डावखरे, किरण सरनाईक, पंकज भुजबळ, राजहंस सिंह, शिवाजीराव गर्जे, योगेश टिळेकर, श्रीमती उमा खापरे, सर्वश्री ज्ञानेश्वर म्हात्रे, विक्रांत पाटील, सदाशिव खोत, अमित गोरखे, वसंत खंडेलवाल, डॉ.परिणय फुके, सर्वश्री अमरीशभाई पटेल, धर्मगुरु बाबुसिंग राठोड, रणजितसिंह मोहिते-पाटील, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव –**

"हे राज्य लोकांचे आहे आणि लोकांसाठी आहे" ही भावना मनामध्ये ठेवून महायुतीचे शासन वेगाने कार्यरत असणे, मुंबई-पुणे व एमएमआरडीएसह राज्यातील अन्य छोट्या शहरांमध्ये स्टार्टअपची संख्या वाढत असल्याने इंडिया स्टार्टअपनी घोषित केलेल्या आकडेवारीनुसार महाराष्ट्र हे स्टार्टअपचे देशातील पहिल्या क्रमाकांचे राज्य ठरले असणे, महायुती शासनाने महाराष्ट्रात अशक्य वाटणारा समृध्दी महामार्ग कार्यान्वित केला असणे, या महामार्गामुळे मुंबई-पुण्यात होणारी गुंतवणूक धुळे, गडचिरोली, नागपूर, अमरावती या भागात वाढत असल्याचे निदर्शनास येणे, नागपूर-गोवा शक्तीपीठ द्रुतगती मार्गाचे बांधकाम हाती घेण्याचा निर्णय घेतला असणे, या द्रुतगती मार्गामुळे, त्या मार्गावरील प्रमुख धार्मिक क्षेत्रे व तिर्थस्थळे जोडण्याचे

अस्वाक्षरित प्रत

प्रयोजन असून या प्रदेशातील आर्थिक विकासाला देखील चालना मिळू शकेल, राज्याच्या शहरी भागात पायाभुत सुविधांद्वारे शहरी जीवनमान सुधारण्यासाठी 'नगरोत्थान महाभियान' प्रभावीपणे राबविण्याचे प्रयोजन असणे, या योजनेंतर्गत पाणी पुरवठा, मलःनिस्सारण व विकास यांचे सुरु असलेले प्रकल्प दोन वर्षांत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असणे, मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी असल्याने या शहरामध्ये गृहनिर्माण व गतीमान परिवहन हे मुद्दे प्राधान्याने विचारात घेऊन स्मार्ट सिटीच्या माध्यमातून स्थानिकांचे जीवनमान उंचावण्यासाठी शासनाचा प्रयत्न असणे, मेट्रो-२ ए आणि २ बी ची सेवा सुरु झाल्याने पश्चिम द्रुतगती मार्गावरील अंधेरी आणि दहिसरच्या मध्ये वाहतुक कोंडी कमी होऊन मुंबईकरांचे प्रवास सुखकर झाल्याचे दिसून येणे, ठाणे-बोरीवली भुयारी मार्गाची निर्मिती करण्याचे धोरण प्रस्तावित असणे, मुंबई-पुणे मिसिंग लिंक या ६७०० कोटी रुपयांच्या प्रकल्पाचे काम सुरु असणे, वर्सोवा-वांद्रे सागरी सेतुची निर्मिती, शिवडी ते न्हावाशेवा या मुंबई पारबंदर प्रकल्पाची निर्मिती जलदगतीने सुरु असणे, मुंबईतील कुर्ला येथील नेहरूनगर, टिळकनगर या म्हाडा वसाहतीतील अनेक इमारतींचा पुनर्विकास होऊन १० ते १५ वर्षे उलटल्यानंतरही त्यांना भोगवटा प्रमाणपत्र मिळाली नसल्याचे निदर्शनास येणे, या गृहनिर्माण वसाहतींसाठी लागू केलेल्या अभय योजनेची मुदत वाढविण्याची आवश्यकता, कुर्ला येथील रेल्वे हद्दीतील संतोषी माता नगर, साबळे नगर व क्रांतीनगर येथे अनेक वर्षे राहणाऱ्या झोपडीधारकांना रेल्वे प्रशासनामार्फत पर्यायी जागा उपलब्ध करण्याकरिता राज्य शासनाने प्रयत्न करण्याची आवश्यकता, नेहरूनगर येथील म्हाडाच्या वसाहतीत राहणाऱ्या पोलीस कर्मचा-यांना माफक दरात निवासस्थाने उपलब्ध करून देण्याची आवश्यकता, राज्यभरात ४०९ नागरी समुहांमध्ये 'प्रधानमंत्री आवास योजना (शहरी)' राबविण्याचे प्रयोजन असणे, या योजनेंतर्गत २ लाखांपेक्षा अधिक घरे बांधण्यात आली असून, १ लाख ८५ हजारांपेक्षा अधिक घरांचे बांधकाम प्रगतीपथावर असणे, मेट्रो तसेच कोस्टल रोड प्रकल्प पूर्ण झाल्याने मुंबईकरांचे जीवनमान उंचावणे, मुंबईतील कोळीवाडा आणि गावठाणाकरिता सीमांकन करून वेगळी विकास नियंत्रण नियमावली तातडीने तयार करण्याची आवश्यकता, कोळीवाडे व गावठाणांची झालेली दुरावस्था तातडीने दूर करण्याची आवश्यकता, पुण्यातील सहकारी गृहनिर्माण संस्था व वसाहतींचे स्ट्रक्चरल ऑडीट करुन पुनर्विकास करण्याची आवश्यकता, पुणे शहरात विमानतळाकरिता जागा राखीव असून अन्य पायाभुत सुविधा तातडीने करण्याची आवश्यकता, पुण्यातील जुन्या ब्रिटीशकालीन वाड्यांचा पुनर्विकास करण्याची आवश्यकता, जुन्या चाळींची व्याख्या बदलून हेरिटेज टिडीआर प्रत्यक्ष अंमलात

अग्रिम प्रत

आला असणे, एमएमआरडीए क्षेत्रात सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या पुनर्विकासासाठी मुंबई जिल्हा बँकेला नोडल एजन्सी म्हणून मान्यता देण्यात येणे, मुंबईतील जुन्या इमारतींच्या स्वयंपुनर्विकासाकरिता मुंबई जिल्हा बँकेकडून देण्यात येणाऱ्या कर्ज मर्यादेत वाढ करण्यात आली असल्याने गृहनिर्माण प्रकल्प वेगाने उभे रहात असल्याचे निदर्शनास येणे, मानीव अभिहस्तांतरण करण्यासाठी स्टॅम्प डयुटी भरण्यात सुलभता होण्यासाठी मुद्रांक शुल्क अभय योजना सुरु करण्यात येणे, झोपडपट्टी पुनर्वसन मधील सदनिका हस्तांतरण शुल्कात ५० टक्के कपात करण्याचा निर्णय घेण्यात येणे, राज्यात ५१ लाख घरे बांधण्याचे प्रस्तावित असणे, ठाणे शहरात एमआयडीसीच्या अभिन्यासातील १५०० हेक्टर भूखंडावर जगातील सर्वात मोठा क्लस्टर प्रकल्प राबविण्यात येणे, समूह विकास पध्दतीने हा प्रकल्प राबविण्याचे प्रयोजन असणे, वाशी येथील सध्याच्या दोन खाडी पुलांना समांतर अशा तिसऱ्या सहा पदरी खाडी पुलाच्या प्रकल्पाचे काम सुरु असणे, नवी मुंबई विमानतळामुळे वाढणाऱ्या लोकसंख्येसाठी नियोजित 'नैना' प्राधिकरणामार्फत २३ गावांच्या नियोजित आराखडयाच्या अंमलबजावणीस गती देण्याची आवश्यकता, मुंबई, पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर यांसारख्या मोठ्या शहराचा मेगापॉलिस मेटाव्हर्स प्रकल्पाच्या मदतीने अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन जागतिक पटलावरचे हे महानगर त्याच उच्च दर्जाचे व्हावे व येथील प्रत्येक कुटुंबात सुख आणि समाधान नांदावे ही या शासनाची महत्वाकांक्षा असणे, मुंबई व एमएमआरडीए क्षेत्रातील घरांची समस्या, वाहतुक समस्या इ. चे गतीमानतेने निर्मूलन करून मुंबईचा पर्यावरणपूरक विकास करण्याच्या दृष्टीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

**आठ : अर्धा-तास चर्चा — म.वि.प. नियम ९२ अन्वये (बैठकीच्या शेवटी) —**

(१) **सर्वश्री मिलिंद नार्वेकर,** सुनिल शिंदे, ॲड.अनिल परब, **वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

"महाराष्ट्रात १०,००० गिरीभ्रमण आणि गिर्यारोहण यांचे आयोजक आणि संस्था असणे, परंतु या आयोजक आणि संस्थांकडून सुरक्षिततेच्या दृष्टीने उपक्रम राबविले जात नसणे, त्यामुळे गिरीभ्रमण आणि गिर्यारोहण दरम्यान प्राणघातक अपघात होत असणे, मागील तीन दशकांत गिरीभ्रमण, गिर्यारोहण आणि इतर साहसी उपक्रमांत सहभाग घेणा-यांची संख्या वाढलेली असणे, परंतु याकरिता योग्य अनुभव आणि साधनसामुग्री, कुशल संघटन आणि सुरक्षिततेसाठी उपाययोजना यांकडे या बहुतेक उपक्रमात गांभीर्याने लक्ष दिले जात नसणे, त्यामुळे अतिरंजित जाहिरातींना बळी पडून अननुभवी, उत्साही पर्यटक आकर्षित होणे, आयोजकांकडून सुरक्षेकडे दुर्लक्ष करण्यात येणे, त्यामुळे अपघातांच्या संख्येत वाढ झालेली असणे, त्याकरिता या

अप्रकाशित

उपक्रमात कठोर नियमन गरजेचे असणे, शासनाकडून काही प्रमाणात अशा उपक्रमावर बंदी घालण्याचा तात्कालिक उपाय करण्यात येणे, परंतु जीवितहानी रोखण्यासाठी मजबूत, कठोर आणि समंजस नियमन व्यवस्थेची गरज असणे, या गंभीर प्रश्नांकडे शासनाने गांभीर्याने लक्ष घालून गिरीभ्रमण आणि गिर्यारोहण आणि इतर साहसी उपक्रमांत सहभाग घेणा-या पर्यटकांच्या सुरक्षिततेसाठी नियमन अंमलात आणण्याकरिता करावयाची कार्यवाही व उपाययोजना"

(२) **सर्वश्री सदाशिव खोत,** अमित गोरखे, डॉ. परिणय फुके **वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

"सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने नोकर भरतीत, फर्निचर खरेदीत, संगणक खरेदीत अशा अनेक प्रकरणांमध्ये गैरव्यवहार केला असून, सदरहू गैरव्यवहारांची विभागीय चौकशी सुरु असणे, सहकार आयुक्तांनी सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेवर चौकशीचे ताशेरे ओढले असणे, सदरहू बँकेच्या गैरकारभाराप्रकरणी विभागीय चौकशी सुरु असतांनाही बँकेने माणगंगा सहकारी साखर कारखान्याची लिलाव प्रक्रिया बेकायदेशीरपणे सुरु केली असणे, सदर बँकेचे एकूण कर्ज ११८ कोटी रुपये असून, या कर्जासाठी साखर कारखाना लिलाव पद्धतीने देण्यासाठी बँकेने लिलाव प्रक्रिया केली असणे, माणगंगा सहकारी साखर कारखान्याची २२९ एकर जमीन मिळविण्यासाठी काही राजकीय नेते मंडळी प्रयत्न करित असल्याचे निदर्शनास येणे, विशेष कार्यकारी अधिकारी व सहनिबंधक सहकारी संस्था, महाराष्ट्र शासन यांनी सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य, पुणे यांना दिनांक ३० डिसेंबर, २०२२ रोजी पत्र देऊन सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या चौकशीची स्थगिती उठविलेली असणे, सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक मंडळ व नेतेमंडळी यांनी संगनमत करुन साखर कारखान्याची मालमत्ता बाबासाहेब देशमुख इंडस्ट्रीज प्रा.लि. च्या ताब्यात देण्यासाठी बेकायदेशीररित्या लिलाव प्रक्रिया सुरु केली असणे, त्यामुळे सदरहू लिलाव प्रक्रिया रद्द करुन साखर कारखाना सभासदांचा रहावा, अशी मागणी लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री यांचेकडे माहे जानेवारी, २०२५ मध्ये केली असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**विधान भवन,**
मुंबई
दिनांक : ११ मार्च, २०२५

**जितेंद्र भोळे**
सचिव (१) (कार्यभार),
महाराष्ट्र विधानपरिषद